भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# हिंदू विवाह अधिनियम, १९५५

(१९५५ चा अधिनियम क्रमांक २५)

[५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान]

# Hindu Marriage Act, 1955

( Act No. 25 of 1955 )

[ As in force on the 5th December 1991 ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले
१९९३
[किंमत : रुपये ३.५०]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला हिंदू विवाह अधिनियम, १९५५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक १ दिनांक ७ जानेवारी १९९२ यात पृष्ठ ५३ ते ६४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,<br>दिनांक ७ जानेवारी १९९२.

व्ही. एस. रमादेवी,<br>सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Hindu Marriage Act, 1955 as on the 5th December 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 3, dated 7th January 1992 on pages 53 to 64.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,<br>dated 7th January 1992.

V. S. RAMADEVI,<br>Secretary to the Government of India.

# हिंदू विवाह अधिनियम, १९५५

## कलमांचा क्रम

कलमे


प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. अधिनियमाची प्रयुक्ती.

३. व्याख्या.

४. अधिनियमाचा अधिभावी परिणाम.

५. हिंदू विवाहाच्या शर्ती.

६. (निरसित).

७. हिंदू विवाहाचे संस्कार.

८. हिंदू विवाहांची नोंदणी.

९. दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापन.

१०. न्यायिक फारकत.

११ शून्य विवाह.

१२. शून्यकरणीय विवाह.

१३. घटस्फोट.

१३क. घटस्फोटकाच्या कार्यवाहीमध्ये पर्यायी अनुतोष.

१३.ख. परस्पर संमतीने घटस्फोट.

१४ विवाहानंतर १ वर्षाच्या आत कोणताही विनंतीअर्ज सादर करावयाचा नाही.

१५. घटस्फोटीत व्यक्तींना पुन्हा केव्हा विवाह करता येईल.

१६. शून्य किंवा शून्यकरणीय विवाहसंबंधातून निर्माण झालेल्या अपत्यांची औरसता.

१७. द्विविवाहाबद्दल शिक्षा.

१८. हिंदू विवाहाच्या अन्य विवक्षित शर्तींच्या व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा.

१९. ज्याकडे विनंती अर्ज करावा ते न्यायालय.

२०. विनंतीअर्जाचा मजकूर व त्यांचे सत्यापन.

२१. १९०८ चा अधिनियम ५ लागू करणे.

२१क. विवक्षित प्रकरणी विनंतीअर्ज वर्ग करण्याचा अधिकार.

२१ख. या अधिनियमाखालील विनंतीअर्जांची संपरीक्षा करून ते निकालात काढण्याविषयी विशेष उपबंध.

२१ग. कागदोपत्री पुरावा.

२२. कार्यवाही जनान्तिकपणे करावी व अशा वेळी तिचे कामकाजवृत्त मुद्रित किंवा प्रकाशित करू नये.

२३. कार्यवाहीतील हुकूमनामा.

२४. दावा प्रलंबित असताना निर्वाह खर्च व कार्यवाहीचा खर्च.

२५. स्थायी पोटगी व निर्वाह खर्च.

२६. अपत्यांचा ताबा.

२७. संपत्तीची विल्हेवाट.

२८. हुकूमनामे व आदेश यांवर अपिले.

२८क. हुकूमनाम्यांची व आदेशांची अंमलबजावणी.

२९. व्यावृत्ती.

३०. निरसने.

# हिंदू विवाह अधिनियम, १९५५

(१९५५ चा अधिनियम क्रमांक २५)[1]

(५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान) [१८ मे १९५५]

**हिंदूंमधील विवाहासंबंधीचा कायदा विशोधित व संहिताबद्ध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**प्रारंभिक**

१. (१) या अधिनियमास "हिंदू विवाह अधिनियम, १९५५" असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव व विस्तार.**

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे, आणि ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्यांमध्ये अधिवासी असलेले जे हिंदू उक्त राज्यक्षेत्रांबाहेर असतील त्यांनाही तो लागू आहे.

२. (१) हा अधिनियम— अधिनियमाची प्रयुक्ती.

(क) वीरशैव, लिंगायत अथवा ब्राह्मोसमाजाचा, प्रार्थनासमाजाचा किंवा आर्यसमाजाचा अनुयायी यांसुद्धा, जी व्यक्ती धर्माने—त्याचे कोणतेही रूप किंवा विकसन यांनुसार—हिंदू आहे अशा कोणत्याही व्यक्तीला,

(ख) जी व्यक्ती धर्माने बौद्ध, जैन किंवा शीख आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, आणि

(ग) ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्यांमध्ये अधिवासी असलेली जी व्यक्ती धर्माने मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी किंवा ज्यू नाही अशी अन्य कोणतीही व्यक्ती, जर हा अधिनियम पारित झाला नसता तर यात परामर्श घेण्यात आलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधी हिंदू कायद्याने अथवा त्या कायद्याचा भाग असलेल्या कोणत्याही रुढीने किंवा परिपाठाने नियंत्रित झाली नसती असे शाबीत होत नसेल तर अशा कोणत्याही व्यक्तीला,

लागू आहे.

**स्पष्टीकरण.**—पुढील व्यक्ती धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा प्रकरणपरत्वे, शीख आहेत :—

(क) ज्याच्या मातापित्यांपैकी दोघेही धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख आहेत असे कोणतेही औरस किंवा अनौरस अपत्य;

(ख) ज्याच्या मातापित्यांपैकी एकजण धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख आहे आणि अशी माता व असा पिता ज्या जनजातीतील, समाजातील, समूहातील किंवा कुलातील आहे किंवा होता त्याचा घटक म्हणून ज्याचे पालनपोषण करण्यात आले आहे असे कोणतेही औरस किंवा अनौरस अपत्य; आणि

(ग) जी व्यक्ती धर्मांतर किंवा पुनर्धर्मांतर करून हिंदू, बौद्ध जैन किंवा शीख धर्मात आलेली आहे अशी कोणतीही व्यक्ती.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट संविधानाच्या अनुच्छेद ३६६ चा खंड (२५) याच्या अर्थानुसार असलेल्या कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या घटकव्यक्तींना लागू असणार नाही—मात्र केंद्र शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अन्यथा निदेशित केले तर तो अपवाद समजावा.

(३) या अधिनियमाच्या कोणत्याही भागातील "हिंदू" या शब्दप्रयोगात, जी व्यक्ती धर्माने हिंदू नसली तरी या कलमात अंतर्भूत असलेल्या उपबंधाच्या आधारे जिला हा अधिनियम लागू होतो अशी जी व्यक्ती आहे तिचा त्यात जणू काही समावेश असावा अशा तऱ्हेने या शब्दप्रयोगाचा अर्थ लावला जाईल.

३. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "रूढी" व "परिपाठ" या शब्दप्रयोगांद्वारे जो नियम सातत्याने व एकाच स्वरूपात दीर्घकाळ पाळला जात असून ज्याला हिंदूमध्ये कोणत्याही स्थानिक क्षेत्रात, जनजातीत, समाजात, समूहात किंवा कुलात कायद्याने बळ प्राप्त झालेले आहे असा कोणताही नियम दर्शविला जातो :

परंतु, तो नियम निश्चित असावा आणि गैरवाजवी किंवा लोकधोरणाच्या विरुद्ध नसावा; आणि :

परंतु आणखी असे की, फक्त कुलालाच लागू असलेल्या नियमाच्या बाबतीत, त्या कुलाने तो सोडून दिलेला नसावा;

---

१. १९६३ चा विनियम ६, कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे दादरा व नगरहवेली यांना हा अधिनियम, दिनांक १ जुलै १९६५ पासून लागू करण्यात आला आणि १९६३ चा विनियम ७, कलम ३ व १ ली अनुसूची यांद्वारे सुधारणा करून तो पाँडिचेरीला दिनांक १ नोव्हेंबर १९६३ पासून लागू करण्यात आला.

(ख) "जिल्हा न्यायालय" याचा अर्थ, ज्याच्यासाठी नगर दिवाणी न्यायालय असेल अशा कोणत्याही क्षेत्रात ते न्यायालय, व अन्य कोणत्याही क्षेत्रात अव्वल अधिकारितेचे प्रधान दिवाणी न्यायालय असा आहे, आणि जे दिवाणी न्यायालय या अधिनियमात परामर्श घेण्यात आलेल्या बाबीं-संबंधात अधिकारिता असलेले न्यायालय म्हणून राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधि-सूचनेद्वारे विनिर्दिष्ट केले जाईल अशा अन्य कोणत्याही दिवाणी न्यायालयाचा त्यात समावेश आहे;

(ग) "सख्खे नाते" आणि "सापत्न नाते"—जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वजपुरूषापासून त्याच्या एकाच पत्नीच्या द्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा, त्या एकमेकाशी सख्या नात्याने आणि जेव्हा त्यांचा समान पूर्वजपुरूषापासून पण त्यांच्या निरनिराळ्या पत्नींच्या द्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा, त्या व्यक्ती एकमेकाशी सापत्न नात्याने संबंधित आहेत असे म्हणतात;

(घ) "सहोदर नाते"—जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वजस्त्रीपासून पण तिच्या निरनिराळ्या पतींच्या द्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा, त्या व्यक्ती एकमेकीशी सहोदर नात्याने संबंधित आहेत असे म्हणतात;

स्पष्टीकरण.—खंड (ग्) व (घ्) यांमध्ये, "पूर्वजपुरुष" यात पित्याचा व "पूर्वजस्त्री" यात मातेचा समावेश आहे;

(ङ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(च्) (एक) कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात "सपिंड नातेसंबंधा" ची व्याप्ती मातेकडून आरोही वंशक्रमाने तिसऱ्या पिढीपर्यंत (ती धरून), आणि पित्याकडून आरोही वंशक्रमाने पाचव्या पिढीपर्यंत (ती धरून) आहे—प्रत्येक बाबतीत संबंधित व्यक्ती ही पहिली पिढी म्हणून तिची गणना करून तिच्यापासून वंशक्रमाचा वरच्या दिशेने मागोवा घ्यावा;

(दोन) जर दोन व्यक्तींपैकी सपिंड नातेसंबंधाच्या मर्यादेत एक व्यक्ती दुसरीची रेषीय पूर्वज असेल, किंवा जर त्यांच्यापैकी प्रत्येक व्यक्तीच्या संदर्भात जो सपिंड नातेसंबंधाच्या मर्यादेत आहे असा त्यांचा समान रेषीय पूर्वज असेल तर, त्या व्यक्ती एकमेकींच्या "सपिंड" आहेत असे म्हणतात;

(छ्) "निषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणी" —दोन व्यक्तींपैकी,—

(एक) एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची रेषीय पूर्वज असेल तर; किंवा

(दोन) एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या रेषीय पूर्वजाची किंवा वंशजाची पत्नी किंवा पती होती असे असेल तर; किंवा

(तीन) एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या भावाची अथवा पित्याच्या किंवा मातेच्या भावाची अथवा आज्याच्या किंवा आजीच्या भावाची पत्नी होती असे असेल तर; किंवा

(चार) जर दोघे बहीण-भाऊ/चुलता-पुतणी/मामा-भाची, आत्या-भाचा/मावशी-भाचा चुलती-पुतण्या, अथवा भावाची व बहिणीची किंवा दोन भावांची किंवा दोन बहिणींची अपत्ये असतील तर,

त्या व्यक्ती "निषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणीच्या" अंतर्गत आहेत असे म्हणतात;

स्पष्टीकरण.—खंड (च्) आणि (छ्) यांच्या प्रयोजनार्थ, "नातेसंबंध" यात—

(एक) सापत्न किंवा सहोदर नात्याचा व तसेच सख्या नात्याचा संबंध;

(दोन) अनौरस तसेच औरस रक्तसंबंध;

(तीन) दत्तकाचा तसेच रक्ताचा नातेसंबंध;

यांचा समावेश आहे आणि त्या खंडातील नातेसंबंधविषयक सर्व संज्ञांचा अर्थ तदनुसार लावला जाईल.

**अधिनियमाचा अधिभावी परिणाम.**

४. या अधिनियमात व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही,—

(क्) हिंदू कायद्याचे कोणतेही वचन, नियम किंवा निर्वचन अथवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी त्या कायद्याचा भाग म्हणून अंमलात असलेली कोणतीही रूढी किंवा परिपाठ या अधिनियमात जिच्याकरिता उपबंध केलेला आहे अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात परिणामक असण्याचे समाप्त होईल,

(ख्) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्यांपैकी कोणत्याही उपबंधांशी, तो जेथवर विसंगत असेल तेथवर परिणामक असण्याचे समाप्त होईल.

हिंदू विवाह

५. पुढील शर्ती पूर्ण झाल्यास, कोणत्याही दोन हिंदूमध्ये विवाह विधिपूर्वक लावता येईल ; त्या शर्ती अशा— हिंदू विवाहाच्या शर्ती.

(एक) विवाहाच्या वेळी कोणत्याही पक्षास हयात विवाहसाथी नसावा;

[१][(दोन) विवाहाच्या वेळी कोणताही पक्ष,—

(क) मनोविकलतेमुळे विवाहास विधिग्राह्य संमती देण्यास असमर्थ नसावा ; किंवा

(ख) विधिग्राह्य संमती देण्यास समर्थ असला तरी, विवाह करण्यास आणि संततीला जन्म देण्यास अपात्र ठरेल अशा प्रकारचा वा अशा प्रमाणात त्याच्यात मानसिक बिघाड झालेला नसावा; किंवा

(ग) त्याला वारंवार भ्रमिष्टपणाचे वा अपस्माराचे झटके येत नसावेत;]

(तीन) विवाहाच्या वेळी वराच्या वयाला [२][एकवीस वर्षे] व वधूच्या वयाला [२][अठरा वर्षे] पूर्ण झालेली असावीत;

(चार) पक्ष निषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणींच्या अंतर्गत नसावेत—मात्र त्यांच्यापैकी प्रत्येकाचे नियंत्रण करणाऱ्या रूढीने किंवा परिपाठाने उभयतांमधील विवाहास मुभा दिलेली असेल तर तो अपवाद समजावा;

(पाच) पक्ष एकमेकांचे सपिंड नसावेत—मात्र त्यांच्यापैकी प्रत्येकाचे नियंत्रण करणाऱ्या रूढीने किंवा परिपाठाने उभयतांमधील विवाहास मुभा दिलेली असेल तर तो अपवाद समजावा;

[३]* * * * *

६. [निरसित.]

७. (१) हिंदू विवाह त्यातील कोणत्याही पक्षाचे रुढिप्राप्त धर्मविधि व संस्कार यानुसार विधिपूर्वक लावता येईल. हिंदू विवाहाचे संस्कार.

(२) जेथे असे धर्मविधी व संस्कार यांत "सप्तपदी" (म्हणजे, वधूवरांनी जोडीने होमाग्नीच्या साक्षीने सात पावले टाकणे) समाविष्ट असते तेथे, सातवे पाऊल टाकले जाते तेव्हा विवाह पूर्ण व बंधनकारक होतो.

८. (१) हिंदू विवाहांची शाबिती सुकर करण्यासाठी, अशा कोणत्याही विवाहातील पक्षांना आपल्या विवाहासंबंधीच्या तपशिलाची नोंद त्या प्रयोजनार्थ ठेवलेल्या 'हिंदू विवाह नोंदपुस्तकात', विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या अधीनतेने करून घेता यावी यासाठी उपबंध करणारे नियम राज्य शासनाला करता येतील. हिंदू विवाहांची नोंदणी.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर तसे आवश्यक किंवा समयोचित आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे तपशिलाची नोंद करणे त्या राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात—मग ते सर्व बाबतींत असो वा विनिर्दिष्ट केल्या जातील अशा बाबतींत असो—सक्तीचे राहील असे त्याला उपबंधित करता येईल आणि असा कोणताही निदेश दिलेला असेल तेव्हा, याबाबत केलेल्या कोणत्याही नियमाचे व्यतिक्रमण करणारी कोणतीही व्यक्ती पंचवीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(३) या कलमाखाली केलेले सर्व नियम, ते केल्यानंतर होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवले जातील.

(४) 'हिंदू विवाह नोंदपुस्तक' सर्व वाजवी वेळी निरीक्षणार्थ खुले राहील, व त्यात अंतर्भूत असलेल्या निवेदनांचा पुरावा म्हणून ते ग्राह्य असेल आणि अर्ज करून निबंधकाकडे विहित फी भरल्यानंतर त्याच्याकडून त्यातील प्रमाणित उतारे दिले जातील.

(५) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही हिंदू विवाहाची नोंद करण्यास चुकल्यामुळे त्या विवाहाच्या विधिग्राह्यतेवर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही.

---

१. १९७६ चा अधिनियम ६८, कलम २ द्वारे खंड (दोन) ऐवजी घातले.

२. १९७८ चा अधिनियम २, कलम ६ व अनुसूची यांद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ व अनुसूची यांद्वारे गाळले.

दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापन व न्यायिक फारकत

दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापन. ९. [1]***जेव्हा पती किंवा पत्नी वाजवी सबब असल्याशिवाय दुसऱ्याच्या सहवासातून दूर झाली असेल तेव्हा, नाराज पक्षाला जिल्हा न्यायालयाकडे दांपत्याधिकारांच्या प्रत्यास्थापनासाठी विनंती-अर्ज करून अर्ज करता येईल आणि अशा विनंतीअर्जात केलेली निवेदने सत्य असल्याबाबत व अर्ज संजूर केला जाऊ नये असे कोणतेही वैध कारण नाही याबाबत खात्री झाल्यावर, न्यायालयाला तदनुसार दांपत्याधिकारांच्या प्रत्यास्थापनाचा हुकूमनामा करता येईल.

[2][स्पष्टीकरण.—अशा रीतीने सहवासातून दूर होण्यास वाजवी सबब होती किंवा कसे असा प्रश्न उद्भवेल त्याबाबतीत, वाजवी सबब असल्याचे सिद्ध करण्याची जबाबदारी, जी व्यक्ती सहवासातून दूर गेलेली असेल त्या व्यक्तीवर राहील.]

[3]* * * * *

न्यायिक फारकत. १०. [4][(१) विवाह या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी लावलेला असो वा नंतर लावलेला असो—त्यातील कोणत्याही पक्षाला, कलम १३ पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही कारणास्तव, न्यायिक फारकतीचा हुकूमनामा मिळण्यासाठी विनंतीअर्ज सादर करता येईल आणि पत्नीच्या बाबतीत, ज्या कारणांस्तव घटस्फोट मिळवण्यासाठी विनंतीअर्ज सादर करता आला असता अशी कारणे म्हणून त्या कलमाच्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांच्या आधारेही तिला असा न्यायिक फारकतीचा हुकूमनामा मिळविण्यासाठी विनंतीअर्ज सादर करता येईल.]

(२) न्यायिक फारकतीचा हुकूमनामा देण्यात आला असेल त्याबाबतीत, त्यानंतर उत्तरवादीबरोबर दांपत्यभावाने राहणे विनंतीअर्जदारावर बंधनकारक असणार नाही, पण कोणत्याही पक्षाने विनंती-अर्जाद्वारे अर्ज केल्यावर आणि अशा विनंतीअर्जात केलेल्या निवेदनांच्या सत्यतेबाबत खात्री झाल्यावर जर न्यायालयास तसे न्याय्य व वाजवी वाटले तर, त्यास हुकूमनामा विखंडित करता येईल.

विवाहाची शून्यता व घटस्फोट

शून्य विवाह. ११. या अधिनियमाच्या प्रारंभानंतर विधिपूर्वक लावण्यात आलेला कोणताही विवाह, जर त्याद्वारे कलम ५ च्या खंड (एक), (चार) व (पाच) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही एका शर्तीचे व्यतिक्रमण झाले तर, रद्दबातल होईल आणि त्यातील कोणत्याही पक्षाने [5][दुसऱ्या पक्षाविरुद्ध] विनंतीअर्ज सादर केल्यावर शून्यतेच्या हुकूमनाम्याद्वारे तो तसा झाल्याचे घोषित करता येईल.

शून्यकरणीय विवाह. १२. (१) कोणताही विवाह—मग तो अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी लावलेला असो वा नंतर लावलेला असो—पुढीलपैकी कोणत्याही कारणावरून शून्यकरणीय असेल व शून्यतेच्या हुकूमनाम्याद्वारे तो रद्दबातल करता येईल, ती कारणे अशी :—

[6](क) उत्तरवादीच्या मैथुनाक्षमतेमुळे विवाहाची परिपूर्ती झालेली नाही; किंवा

(ख) त्या विवाहामुळे कलम ५ च्या खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीचे व्यतिक्रमण झाले आहे ; किंवा

(ग) विनंतीअर्जदाराची संमती, किंवा जेथे [8]['बालविवाह निरोध (विशोधन) अधिनियम, १९७८' याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कलम ५ जसे होते त्यानुसार] विनंतीअर्जदाराच्या विवाहार्थ पालकाची संमती आवश्यक होती तेथे, अशा पालकाची संमती बळजबरीने [7][किंवा संस्कारांच्या स्वरूपाबाबत अथवा उत्तरवादीसंबंधीची कोणतीही महत्त्वाची वस्तुस्थिती वा परिस्थिती याबाबत लबाडी करून] मिळविण्यात आली होती; किंवा

(घ) विवाहाच्या वेळी उत्तरवादी स्त्री ही विनंतीअर्जदाराहून अन्य व्यक्तीपासून गरोदर होती.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विवाह रद्दबातल करण्यासाठी केलेला कोणताही विनंतीअर्ज—

(क) तो पोटकलम (१) च्या खंड (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणावरून केला असेल त्याबाबतीत, जर—

(एक) बळजबरीचा प्रभाव थांबल्यानंतर किंवा, प्रकरणपरत्वे, लबाडी नजरेस आल्यानंतर एक वर्षाहून अधिक काळाने विनंतीअर्ज सादर करण्यात आला असेल तर; किंवा

---

१. १९७६ चा अधिनियम ६८, कलम ३ द्वारे "(१)" हा कंस व आकडा गाळला.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे पोट-कलम (२) गाळले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ पोट-कलम (१) ऐवजी घातले.
५. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे घातले.
६. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी घातले.
७. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे "किंवा लबाडीने" याऐवजी घातले.
८. १९७८ चा अधिनियम २, कलम ६ व अनुसूची यांद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(दोन) बळजबरीचा प्रभाव थांबल्यानंतर किंवा, प्रकरणपरत्वे, लबाडी नजरेस आल्यानंतर, विनंतीअर्जदार त्याच्या किंवा तिच्या पूर्ण संमतीने विवाहातील दुसऱ्या पक्षाबरोबर पती किंवा पत्नी म्हणून राहिला/राहिली असेल तर,

विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.

(ख) तो पोटकलम (१) च्या खंड (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणावरून केला असेल त्या बाबतीत,—

(एक) विवाहाच्या वेळी विनंतीअर्जदार अभिकथित् तथ्यांबाबत अनभिज्ञ होता ;

(दोन) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी विधिपूर्वक लावलेल्या विवाहाच्या बाबतीत अशा प्रारंभापासून एक वर्षाच्या आत आणि अशा प्रारंभानंतर विधिपूर्वक लावलेल्या विवाहाच्या बाबतीत विवाहाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत कार्यवाही मांडण्यात आली आहे; आणि

(तीन) [१][उक्त कारण] अस्तित्वात असल्याचे विनंतीअर्जदाराच्या नजरेस आल्यापासून विनंतीअर्जदाराच्या संमतीने वैवाहिक् संभोग घडून आलेला नाही,

अशी न्यायालयाची खात्री झाल्याखेरीज विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.

१३. (१) कोणत्याही विवाहाचा—मग तो या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी लावलेला असो वा नंतर लावलेला असो—पती किंवा पत्नी यांपैकी कोणीही विनंतीअर्ज सादर केल्यावर पुढील कारणावरून घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विच्छेद करता येईल, ते असे— घटस्फोट.

[२][(एक) दुसऱ्या पक्षाने विधिपूर्वक विवाह झाल्यानंतर तिच्या वा त्याच्या विवाहासाथी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीशी स्वेच्छेने संभोग केलेला आहे ; किंवा

(एक-क) दुसऱ्या पक्षाने विधिपूर्वक विवाह झाल्यानंतर विनंतीअर्जदाराला क्रूरपणाची वागणूक दिली आहे ; किंवा

(एक-ख) विनंतीअर्ज दाखल केल्याच्या लगतपूर्वी किमान दोन वर्षे तरी दुसऱ्या पक्षाने विनंतीअर्जदाराचा अभित्याग केलेला आहे ; किंवा]

(दोन) दुसरा पक्ष धर्मांतरामुळे हिंदू राहिलेला नाही ; किंवा

[२][(तीन) दुसऱ्या पक्षाला असाध्य स्वरूपाचे मनोवैकल्य आहे, किंवा विनंतीअर्जदार उत्तरवादीसमवेत आयुष्य घालवू शकेल अशी अपेक्षा करणे वाजवी होणार नाही अशा प्रकारचा वा अशा प्रमाणात त्या दुसऱ्या पक्षामध्ये मानसिक बिघाड सातत्याने अथवा अधूनमधून होत आहे.

**स्पष्टीकरण.—या खंडात,—**

(क) "मानसिक बिघाड" .. शब्दप्रयोगाचा अर्थ, मानसिक आजार, मनाची कुंठित वा अपूर्ण वाढ, मनोविकृतिजन्य वा अन्य प्रकारचा मानसिक बिघाड वा निःसमर्थता असा आहे आणि यात द्विमनस्कताही अंतर्भूत आहे ;

(ख) "मनोविकृतिजन्य बिघाड" या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्यामुळे दुसऱ्या पक्षाची वागणूक प्रमाणाबाहेर आक्रमक किंवा अतिशय बेजबाबदारपणाची बनते असा कायम स्वरूपाचा मानसिक बिघाड अथवा निःसमर्थता असा आहे (यात बुद्धिमत्तेची अवसामान्यता अंतर्भूत असो वा नसो), आणि त्यासाठी वैद्यकीय उपचार होण्याची आवश्यकता किंवा तशी त्याची पात्रता असो वा नसो; किंवा]

(चार) [३]* * * दुसरा पक्ष उग्र व असाध्य स्वरूपाच्या कुष्ठरोगाने पीडित आहे ; किंवा

(पाच) [३]* * * दुसरा पक्ष सांक्रामिक स्वरूपाच्या गुप्त रोगाने पीडित आहे ; **किंवा**

(सहा) दुसऱ्या पक्षाने एखाद्या धार्मिक संप्रदायाची दीक्षा घेऊन प्रपंचाचा त्याग केला आहे; **किंवा**

(सात) दुसरा पक्ष हयात असता तर ते स्वाभाविकपणे ज्यांच्या ऐकिवात आले असते त्या व्यक्तींच्या तो पक्ष हयात असल्याचे सात वर्षे किंवा त्याहून अधिक काळ ऐकिवात नाही; [४]* * *

[४]* * * * *

---

१. १९७६ चा अधिनियम ६८, कलम ६ द्वारे "हुकूमनाम्यास आधारभूत अशी कारणे" या मजकुराऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे मूळ खंडाऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे विवक्षित शब्द गाळले.

४. १९६४ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे खंड (सात) च्या अखेरीचा "किंवा" हा शब्द आणि खंड (आठ) व खंड (९) गाळले.

[1][स्पष्टीकरण.—या पोटकलमात, "अभित्याग" या शब्दप्रयोगाचा अर्थ, विनंतीअर्जदाराचा, विवाहातील दुसऱ्या पक्षाने कोणत्याही वाजवी कारणाविना आणि विनंतीअर्जदाराच्या संमतीशिवाय किंवा इच्छेविरुद्ध अभित्याग करणे असा आहे, आणि यात, विवाहातील दुसऱ्या पक्षाने विनंतीअर्जदाराकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्याच्या कृतीचाही समावेश आहे, आणि या शब्दप्रयोगाच्या सर्व व्याकरणिक रूपभेदांचा व सजातीय शब्दप्रयोगांचा अर्थ तद्नुरूप लावण्यात येईल.]

[1][(१क) विवाह या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी लावलेला असो वा नंतर लावलेला असो—त्यातील कोणत्याही पक्षाला पुढील कारणावरूनही घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विवाहाचा विच्छेद करण्याकरता विनंतीअर्ज सादर करता येईल, ते असे :—

(एक) विवाहातील पक्ष ज्या कार्यवाहीत पक्षकार होते तीत न्यायिक फारकतीचा हुकूमनामा झाल्यानंतर [3][एक वर्ष] किंवा त्याहून अधिक काळ त्या पक्षांनी पुन्हा दांपत्यभावाने एकत्र राहण्यास सुरुवात केलेली नाही ; किंवा

(दोन) विवाहातील पक्ष ज्या कार्यवाहीत पक्षकार होते तीत दांपत्याधिकारांच्या प्रत्यास्थापनाचा हुकूमनामा झाल्यानंतर [3][एक वर्ष] किंवा त्याहून अधिक काळ त्या पक्षामध्ये पुन्हा दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापन झालेले नाही.]

(२) पत्नीला पुढील कारणांवरूनही घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे आपल्या विवाहाचा विच्छेद करण्याकरता विनंतीअर्ज सादर करता येईल, ते असे :—

(एक) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी विधिपूर्वक लावलेल्या कोणत्याही विवाहाच्या बाबतीत, अशा प्रारंभापूर्वी पतीने पुन्हा विवाह केलेला आहे किंवा पतीची अशा प्रारंभापूर्वी विवाहित अशी अन्य कोणतीही पत्नी विनंतीअर्जदाराचा विवाह विधिपूर्वक लागण्याच्या वेळी हयात होती :

परंतु, यांपैकी कोणत्याही बाबतीत, ती अन्य पत्नी विनंतीअर्ज सादर होण्याच्या वेळी हयात असावी;

(दोन) विवाह विधिपूर्वक झाल्यानंतर पती बलात्कार, समसंभोग किंवा [4][पशुगमन याबद्दल दोषी होता; किंवा]

[2][(तीन) 'हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६' (१९५६ चा ७८) याच्या कलम १८ खालील दाव्यामध्ये, किंवा 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) याच्या कलम १२५ खालील (किंवा 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याचे तत्सम कलम ४८८ याखालील) कार्यवाहीमध्ये, पतीने पत्नीचा निर्वाहखर्च द्यावा असा त्याच्याविरुद्ध हुकूमनामा किंवा, प्रकरणपरत्वे, आदेश देण्यात आलेला आहे—मग पत्नी जरी पतीपासून वेगळी राहात असली तरी आणि असा हुकूमनामा किंवा आदेश काढल्यापासून एक वर्षापर्यंत वा अधिक काळपर्यंत त्या पक्षांनी पुन्हा दांपत्यभावाने एकत्र राहण्यास सुरुवात केलेली नसली तरी हरकत नाही ;

(चार) तिचा विवाह (मग त्याची परिपूर्ती झालेली असो वा नसो) तिच्या वयाला पंधरा वर्षे पूर्ण होण्याआधी विधिपूर्वक लावण्यात आलेला होता आणि तिने तेवढे वय झाल्यानंतर परंतु ती अठरा वर्षांची होण्याआधी तिने विवाहाचा इन्कार केलेला होता.

स्पष्टीकरण.—'विवाहविषयक कायदे (विशोधन) अधिनियम, १९७६' (१९७६ चा ६८) याच्या प्रारंभापूर्वी वा नंतर विवाह झालेला असला तरीही हा खंड लागू होतो.]

घटस्फोटाच्या कार्यवाहीमध्ये पर्यायी अनुतोष.

[5][१३क. या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, जेथे विनंतीअर्ज कलम १३ पोटकलम (१) चे खंड (दोन), (सहा) आणि (सात) यांमध्ये उल्लेखिलेल्या कारणांवर आधारित असेल अशी प्रकरणे खेरीजकरून एरव्ही, घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विवाहाचा विच्छेद करण्यासंबंधीचा अर्ज आल्यावर न्यायालय, त्या प्रकरणातील परिस्थितीचा विचार करता त्याला तसे न्याय्य वाटल्यास, घटस्फोटाऐवजी न्यायिक फारकतीचा हुकूमनामा करू शकेल.]

परस्परसंमतीने घटस्फोट.

[१३ख. (१) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, विवाहसंबंधातील दोन्ही पक्ष—मग तो विवाह 'विवाहविषयक कायदे (विशोधन) अधिनियम, १९७६' (१९७६ चा ६८) याच्या प्रारंभापूर्वी लावलेला असो वा नंतर लावलेला असो,—अशा कारणास्तव जिल्हा न्यायालयाकडे घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विवाहाचा विच्छेद करण्याविषयीचा विनंतीअर्ज एकत्र सादर करू शकतील की, ते दोन्ही पक्ष एक वर्ष वा त्याहून अधिक काळ वेगवेगळे राहत आहेत किंवा ते एकत्र राहू शकलेले नाहीत आणि विवाहाचा विच्छेद करावा याबाबत त्यांचे परस्परांत एकमत झाले आहे.

---

१. १९६४ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे घातले.
२. १९७६ चा अधिनियम ६८, कलम ७ द्वारे घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे "दोन वर्षे" याऐवजी घातले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे "पशुगमन याबद्दल दोषी होता" याऐवजी घातले.
५. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे घातले.

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेला विनंतीअर्ज सादर केल्याच्या दिनांकानंतर किमान सहा महिन्यांचा कालावधी लोटल्यावर आणि उक्त दिनांकापासून अठरा महिन्यांचा कालावधी पूर्ण होण्याच्या आत दोन्ही पक्षांनी चालना-अर्ज केल्यावर, जर दरम्यानच्या काळात विनंतीअर्ज मागे घेण्यात आलेला नसेल तर, न्यायालय, दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर व त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यावर, तो विवाह विधिपूर्वक लावण्यात आलेला होता आणि विनंतीअर्जातील प्रकथन सत्य होते अशी स्वतःची खात्री झाल्यास, घटस्फोटाचा हुकूमनामा करील आणि हुकूमनाम्याच्या तारखेपासून विवाहाचा विच्छेद झाल्याचे जाहीर करील.

१४. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विवाहाचा विच्छेद करण्याकरता केलेला कोणताही विनंतीअर्ज, [१][तो विनंतीअर्ज सादर होण्याच्या दिनांकास विवाहाच्या दिनांकापासून एक वर्ष लोटले असल्याखेरीज] कोणत्याही न्यायालयाने विचारार्थ स्वीकारणे विधिमान्य होणार नाही : विवाहानंतर [१][एक] वर्षाच्या आत कोणताही विनंतीअर्ज सादर करावयाचा नाही.

परंतु, न्यायालयाला, त्याच्याकडे उच्च न्यायालय त्याबाबत करील अशा नियमांना अनुसरून अर्ज आल्यावर त्या प्रकरणी विनंतीअर्जदाराला आत्यंतिक कष्ट सोसावे लागत आहेत किंवा उत्तरवादी आत्यंतिक नीतिभ्रष्टतेने वागला आहे या कारणावरून विवाहाच्या दिनांकापासून [१][एक वर्ष] लोटण्यापूर्वी विनंतीअर्ज सादर केला जाण्यास मुभा देता येईल, पण विनंतीअर्जदाराने कोणत्याही प्रकारे प्रकरणाच्या स्वरूपाबाबत अपवेदन किंवा लपवणूक करून विनंतीअर्ज सादर करण्यासाठी अनुज्ञा मिळवली असे जर विनंतीअर्जाच्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाला दिसून आले तर न्यायालयाला, त्याने हुकूमनामा अधिघोषित केल्यास, विवाहाच्या दिनांकापासून [१][एक वर्ष] संपून जाईपर्यंत हुकूमनामा परिणामक होणार नाही या शर्तीवर तसे करता येईल अथवा विनंतीअर्ज काढून टाकता येईल—मात्र उक्त एक वर्ष संपल्यानंतर जो करता येईल असा कोणताही विनंतीअर्ज अशा काढून टाकण्यात आलेल्या विनंतीअर्जाच्या पुष्टचर्थ अभिकथित केलेल्या किंवा सारतः त्याच तथ्यांवरून आणण्यास त्यामुळे बाध येणार नाही.

(२) विवाहाच्या दिनांकापासून [१][एक वर्ष] संपण्यापूर्वी घटस्फोटाकरता विनंतीअर्ज सादर करण्याच्या अनुज्ञेसाठी या कलमाखाली करण्यात आलेला अर्ज निकालात काढताना, विवाहसंबंधातून काही अपत्ये झालेली असल्यास त्यांचे हितसंबंध आणि उक्त [१][एक वर्ष] संपण्यापूर्वी पक्षांमध्ये सलोखा होण्याची वाजवी संभाव्यता आहे काय हा प्रश्न न्यायालय लक्षात घेईल.

१५. जेव्हा घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विवाहाचा विच्छेद करण्यात आलेला असेल आणि एकतर हुकूमनाम्याविरुद्ध अपिलाचा अधिकार नसेल किंवा असा अपिलाचा अधिकार असल्यास अपील करण्याची मुदत अपील सादर न होता संपून गेलेली असेल किंवा अपील सादर केलेले असेल पण काढून टाकण्यात आले असेल तेव्हा, विवाहातील कोणत्याही पक्षाने पुन्हा विवाह करणे कायदेशीर होईल : घटस्फोटित व्यक्तींना पुन्हा केव्हा विवाह करता येईल.

[२] * * * * * * * *

[३][१६. (१) कलम ११ खाली एखादा विवाह शून्य व रद्दबातल असला तरीसुद्धा, अशा विवाहसंबंधातून झालेले जे अपत्य, तो विवाह विधिग्राह्य असता तर औरस ठरले असते असे कोणतेही अपत्य औरस ठरेल,—मग ते अपत्य "विवाहविषयक कायदे (विशोधन) अधिनियम, १९७६" (१९७६ चा ६८) याच्या प्रारंभापूर्वी जन्मलेले असो वा नंतर जन्मलेले असो, आणि त्या विवाहाच्या बाबतीत या अधिनियमान्वये शून्यतेचा हुकूमनामा देण्यात आलेला असो वा नसो आणि या अधिनियमाखाली विनंतीअर्ज केल्यावरून नव्हे तर अन्यथा तो विवाह रद्दबादल ठरवण्यात आलेला असो वा नसो. शून्य व शून्यकरणीय विवाहसंबंधातून निर्माण झालेल्या अपत्यांची औरसता.

(२) शून्यकरणीय विवाहाबाबत कलम १२ खाली शून्यतेचा हुकूमनामा देण्यात आलेला असेल त्या बाबतीत तो हुकूमनामा करण्यापूर्वी जन्मास घातलेले किंवा गर्भहित झालेले जे अपत्य, हुकूमनाम्याच्या तारखेस तो विवाह शून्य ठरण्याऐवजी त्याचा विच्छेद झाला असता तर त्या विवाहसंबंधातील दोन्ही पक्षांचे औरस अपत्य ठरले असते असे कोणतेही अपत्य, शून्यीकरणाचा हुकूमनामा काढला असला तरीसुद्धा त्या पक्षांचे औरस अपत्य मानण्यात येईल.

(३) जो विवाह कलम १२ खाली शून्य व रद्दबातल झाला आहे किंवा शून्यतेच्या हुकूमनाम्याद्वारे शून्य झाला आहे अशा विवाहाच्या संबंधातून जन्मलेले कोणतेही अपत्य, हा अधिनियम पारित झाला नसता तर असे अपत्य आपल्या मातापित्यांचे औरस अपत्य नसल्याकारणाने त्याच्या मातापित्यांहून अन्य अशा कोणत्याही व्यक्तींच्या संपत्तीतील किंवा संपत्तीवरील कोणतेही हक्क बाळगण्यास वा संपादन करण्यास अक्षम झाले असते अशा कोणत्याही प्रकरणी, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशा अपत्याला असे कोणतेही हक्क प्रदान होतात असा तिचा अर्थ लावला जाणार नाही. ]

---

१. १९७६ चा अधिनियम ६८, कलम ९ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे परंतुक गाळले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे मूळ कलम १६ ऐवजी घातले.

द्विविवाहाबद्दल शिक्षा. १७. या अधिनियमाच्या प्रारंभानंतर विधिपूर्वक लावण्यात आलेला दोन हिंदूंमधील कोणताही विवाह हा, जर अशा विवाहाच्या दिनांकास कोणत्याही पक्षाला हयात पती किंवा पत्नी असेल तर, शून्य असेल आणि तदनुसार 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) यातील ४९४ व ४९५ या कलमांचे उपबंध लागू होतील.

हिंदू विवाहाच्या अन्य विवक्षित शर्तींचे शर्तींच्या व्यक्ती, व्यतिक्रमणाबद्दल शिक्षा. १८. [१]जी जी व्यक्ती कलम ५ च्या खंड (तीन), (चार) [१][व (पाच)] मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींचे व्यतिक्रमण करून या अधिनियमाखाली स्वतःचा विवाह विधिपूर्वक घडवून आणील अशी प्रत्येक व्यक्ती,—

(क) कलम ५ च्या खंड (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीच्या व्यतिक्रमणाच्या बाबतीत, पंधरा दिवसांपर्यंत असू शकेल अशा साध्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस ;

(ख) कलम ५ च्या खंड (चार) किंवा खंड (पाच) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीच्या व्यतिक्रमणाच्या बाबतीत, एक महिन्यापर्यंत असू शकेल अशा साध्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस; * *

[२]* * * * * * * *

पात्र असेल.

## अधिकारिता व प्रक्रिया

ज्याच्याकडे विनंती-अर्ज करावा ते दिवाणी न्यायालय. [३][१९. या अधिनियमाखालील प्रत्येक विनंतीअर्ज हा, ज्या जिल्हा न्यायालयाच्या साधारण अव्वल दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये,—

(एक) तो विवाह विधिपूर्वक लावण्यात आलेला असेल, किंवा

(दोन) विनंतीअर्ज सादर करण्याच्या वेळी प्रतिवादी राहात असेल, किंवा

(तीन) विवाहसंबंधातील पक्ष शेवटचे एकत्र राहिले असतील, किंवा

(चार) ज्या प्रकरणात, विनंतीअर्ज सादर करण्याच्या वेळी उत्तरवादी हा अधिनियम लागू होणाऱ्या राज्यक्षेत्रांच्या बाहेर राहात असेल, किंवा तो हयात असता तर ते स्वाभाविकपणे ज्यांच्या ऐकिवात आले असते त्या व्यक्तींनी तो हयात असल्याचे सात वर्षे वा अधिक काळपर्यंत ऐकलेले नसेल त्या प्रकरणी, विनंतीअर्ज सादर करण्याच्या वेळी विनंतीअर्जदार राहात असेल, त्या न्यायालयाकडे सादर करावा लागेल.]

विनंतीअर्जाचा मजकूर व त्यांचे सत्यापन. २०. (१) या अधिनियमाखाली सादर करावयाच्या प्रत्येक विनंतीअर्जात अनुतोषाची मागणी ज्याच्यावर आधारलेली असेल ती तथ्ये प्रकरणाच्या स्वरूपानुसार शक्य असेल तितक्या स्पष्टपणे निवेदन करावी लागतील [४][आणि, कलम ११ खालील विनंतीअर्ज खेरीजकरून एरव्ही, विनंतीअर्जदार व विवाहातील दुसरा पक्ष यांच्यात संगनमत नाही असेही निवेदन करावे लागेल.]

(२) या अधिनियमाखालील प्रत्येक विनंतीअर्जात अंतर्भूत असलेली निवेदने विनंतीअर्जदाराकडून किंवा अन्य सक्षम व्यक्तीकडून दावाअर्जांच्या सत्यापनासाठी कायद्याने आवश्यक केलेल्या रीतीने सत्यापित केली जातील, आणि सुनावणीच्या वेळी पुरावा म्हणून त्यांचा आधार घेता येईल.

१९०८ चा अधिनियम ५ लागू करणे. २१. या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या अन्य उपबंधांच्या आणि उच्च न्यायालय याबाबत करील अशा नियमांच्या अधीनतेने, या अधिनियमाखालील सर्व कार्यवाही, होईल तेथवर, "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" (१९०८ चा ५) याद्वारे विनियमित होईल.

विवक्षित प्रकरणी विनंतीअर्ज वर्ग करण्याचा अधिकार. [५][२१क. (१) जेव्हा—

(क) विवाहसंबंधातील एका पक्षाने कलम १० खाली न्यायिक फारकतीच्या हुकूमनाम्याची मागणी करण्यासाठी अथवा कलम १३ खाली घटस्फोटाच्या हुकूमनाम्याची मागणी करण्यासाठी या अधिनियमाखाली एक विनंतीअर्ज अधिकारिता असणाऱ्या जिल्हा न्यायालयाकडे सादर केलेला असेल, आणि

(ख) त्यानंतर त्या विवाहसंबंधातील दुसऱ्या पक्षाने कलम १० खाली न्यायिक फारकतीच्या हुकूमनाम्याची मागणी करण्यासाठी अथवा कलम १३ खाली घटस्फोटाच्या हुकूमनाम्याची मागणी करण्यासाठी या अधिनियमाखाली दुसरा विनंतीअर्ज कोणत्याही कारणास्तव सादर केलेला असेल तेव्हा,—मग तो त्याच जिल्हा न्यायालयात असो वा वेगळ्या जिल्हा न्यायालयात असो, त्याच राज्यात असो वा वेगळ्या राज्यात असो—

त्या विनंतीअर्जावर, पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने कार्यवाही करण्यात येईल.

---

१. १९७८ चा अधिनियम २, कलम ६ व अनुसूची याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ व अनुसूची याद्वारे गाळले.

३. १९७६ चा अधिनियम ६८, कलम १२ द्वारे मूळ कलम १९ ऐवजी घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे "आणि विनंतीअर्जदार व विवाहातील दुसरा पक्ष यांच्यात संगनमत नाही असेही निवेदन करावे लागेल" याऐवजी घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे घातले.

(२) जेथे पोटकलम (१) लागू होते अशा प्रकरणात,—

(क) जर एकाच जिल्हा न्यायालयाकडे विनंतीअर्ज सादर करण्यात आले असतील तर, ते जिल्हा न्यायालय त्या दोन्ही विनंतीअर्जांची एकत्रितपणे संपरीक्षा व सुनावणी करील;

(ख) जर वेगवेगळ्या जिल्हा न्यायालयांकडे विनंतीअर्ज सादर करण्यात आले असतील तर, आधीचा विनंतीअर्ज ज्या जिल्हा न्यायालयाकडे सादर करण्यात आलेला असेल त्या न्यायालयाकडे नंतरचा विनंतीअर्ज वर्ग करण्यात येईल आणि आधीचा विनंतीअर्ज सादर करण्यात आलेल्या न्यायालयाकडून दोन्ही विनंतीअर्जांची एकत्रितपणे सुनावणी व निकाल केला जाईल.

(३) जेथे पोटकलम (२) चा खंड (ख) लागू होतो अशा प्रकरणात, नंतरचा विनंतीअर्ज ज्याच्याकडे सादर करण्यात आलेला असेल त्या जिल्हा न्यायालयामधून, आधीचा विनंतीअर्ज सादर करण्यात आलेल्या न्यायालयाकडे कोणताही दावा किंवा कार्यवाही वर्ग करण्यास, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याअन्वये सक्षम असणारे कोणतेही न्यायालय, किंवा, प्रकरणपरत्वे, शासन हे, जणू काही उक्त संहितेअन्वये वर्ग करण्याचा अधिकार त्यास प्रदान करण्यात आलेला असावा त्याप्रमाणे, असा नंतरचा विनंतीअर्ज वर्ग करण्यासाठी आपल्या अधिकाराचा वापर करील.]

[१][२१ख. (१) या अधिनियमाखालील विनंतीअर्जाच्या संपरीक्षेचे काम हे, त्या संपरीक्षेसंबंधात न्यायानुकूलतेच्या दृष्टीने व्यवहार्य असेल तेथवर रोजच्या रोज चालू ठेवून पूर्ण करण्यात येईल—मात्र एरव्ही पुढील दिवसापर्यंत तहकूब करावयाचे संपरीक्षेचे काम त्यापलिकडेदेखील तहकूब करणे न्यायालयाला काही कारणास्तव आवश्यक वाटले तर, त्याला ती कारणे नमूद करावी लागतील. या अधिनियमाखालील विनंतीअर्जाची संपरीक्षा करून ते निकालात काढण्याविषयी विशेष उपबंध.

(२) या अधिनियमाखालील प्रत्येक विनंतीअर्जाची संपरीक्षा शक्य तेवढ्या त्वरेने करण्यात येईल आणि उत्तरवादीवर विनंतीअर्जाची नोटीस बजावल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत संपरीक्षेचे काम पूर्ण करण्यासाठी नेटाने प्रयत्न करण्यात येईल.

(३) या अधिनियमाखालील प्रत्येक अपिलाची सुनावणी शक्य तेवढ्या त्वरेने करण्यात येईल आणि उत्तरवादीवर त्या अपिलाची नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत सुनावणीचे काम पूर्ण करण्यासाठी नेटाने प्रयत्न करण्यात येईल.]

[१][२१ग. कोणत्याही अधिनियमितीमध्ये विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरीसुद्धा, या अधिनियमाखालील विनंतीअर्जाची संपरीक्षा चालू असताना कोणत्याही कार्यवाहीमध्ये कोणताही दस्तऐवज हा, केवळ तो योग्य रीतीने मुद्रांकित केलेला वा नोंदलेला नाही या कारणास्तव पुराव्यात अग्राह्य ठरणार नाही.] कागदोपत्री पुरावा.

[२][२२. (१) या अधिनियमाखालील प्रत्येक कार्यवाही जनान्तिकपणे चालवली जाईल आणि कोणत्याही व्यक्तीने अशा कोणत्याही कार्यवाहीसंबंधातील कोणतीही बाब मुद्रित किंवा प्रकाशित करणे कायदेशीर होणार नाही—मात्र न्यायालयाच्या पूर्वपरवानगीने मुद्रित वा प्रकाशित केलेला उच्च न्यायालयाचा अथवा सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय याला अपवाद असेल. कार्यवाही जनान्तिकपणे करावी व अशा वेळी तिचे कामकाजवृत्त मुद्रित किंवा प्रकाशित करू नये.

(२) जर कोणत्याही व्यक्तीने पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून कोणतीही बाब मुद्रित किंवा प्रकाशित केली तर, ती व्यक्ती एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडास पात्र होईल.]

२३. (१) या अधिनियमातील कोणत्याही कार्यवाहीत—मग तीत बचाव दिलेला असो वा नसो— कार्यवाहीतील हुकूमनामा.

(क) अनुतोष देण्यासाठी लागणाऱ्या कारणांपैकी कोणतेही कारण अस्तित्वात आहे आणि [३][ज्या बाबतीत, कलम ५-खंड (दोन) चा उप-खंड (क), उप-खंड (ख) किंवा उप-खंड (ग) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणाच्या आधारे विनंतीअर्जदाराने अनुतोषाची मागणी केलेली असेल ती प्रकरणे खेरीजकरून एरव्ही,] अशा अनुतोषासाठी विनंतीअर्जदार त्याच्या किंवा तिच्या स्वतःच्या दुष्कृतीचा किंवा निःसमर्थतेचा कोणत्याही तऱ्हेने फायदा घेत नाही, आणि

(ख) जेथे विनंतीअर्जाचे कारण हे [४]* * * कलम १३ मधील पोटकलम (१) च्या खंड (झ) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कारण असेल तेथे, ज्या कृतीबद्दल किंवा कृतींबद्दल तक्रार केलेली आहे त्यात विनंतीअर्जदार कोणत्याही प्रकारे सहायक झालेला नाही किंवा त्याने त्याकडे काणाडोळा केलेला नाही किंवा त्या क्षमापित केलेल्या नाहीत., अथवा जेथे विनंतीअर्जाचे कारण क्रूरपणाची वागणूक हे असेल तेथे विनंतीअर्जदाराने ती वागणूक कोणत्याही प्रकारे क्षमापित केलेली नाही, आणि

---

१. १९७६ चा अधिनियम ६८, कलम १४ द्वारे घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १५ द्वारे मूळ कलम २२ ऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे विवक्षित शब्द गाळले.

१[(ख्ख) जेव्हा परस्परसंमती असल्याच्या कारणावरून घटस्फोटाची मागणी केलेली असेल तेव्हा, अशी संमती बळजबरीने, कपटाने किंवा गैरवाजवी दडपण आणून मिळवलेली नाही, आणि]

(ग) २[(कलम ११ खाली सादर केलेला विनंती अर्जसोडून अन्य) विनंती अर्ज] उत्तरवादीशी संगनमत करून सादर करण्यात किंवा चालवण्यात आलेला नाही, आणि

(घ) कार्यवाही मांडण्यात कोणताही अनावश्यक किंवा अनुचित विलंब झालेला नाही, आणि

(ङ) अनुतोष न देण्यासारखे अन्य कोणतेही वैध कारण नाही,

याबाबत न्यायालयाची खात्री झाली तर, आणि अशाच बाबतीत,—एरव्ही नाही—न्यायालय तदनुसार अशा अनुतोषाचा हुकूमनामा करील.

(२) या अधिनियमाखाली कोणताही अनुतोष देण्याची कार्यवाही करण्यापूर्वी, त्या त्या प्रकरणाच्या स्वरूपानुरूप व परिस्थितीनुरूप शक्य असेल अशा प्रत्येक प्रकरणी प्रथमतः पक्षांमध्ये सलोखा घडवून आणण्यासाठी हरएक प्रयत्न करणे हे न्यायालयाचे कर्तव्य असेल;

१[परंतु, ज्या कार्यवाहीत कलम १३—पोटकलम (१) चा खंड (दोन), खंड (तीन), खंड (चार), खंड (पाच), खंड (सहा), किंवा खंड (सात) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणावरून अनुतोषाची मागणी केलेली असेल अशा कोणत्याही कार्यवाहीस या पोटकलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.]

१[(३) अशाप्रकारचा सलोखा घडवून आणण्यासाठी न्यायालयास मदत व्हावी यासाठी न्यायालय पक्षांची तशी इच्छा असल्यास किंवा न्यायालयाला तसे न्याय्य व उचित वाटल्यास, कार्यवाही जास्तीत जास्त पंधरा दिवस एवढ्या वाजवी कालावधीपर्यंत तहकूब करू शकेल आणि पक्षांनी या संदर्भात नामनिर्देश केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे अथवा पक्षांना अशा कोणत्याही व्यक्तीचा नामनिर्देश करता आला नाही तर न्यायालय नेमून देईल अशा व्यक्तीकडे ते प्रकरण विचारार्थ पाठवू शकेल आणि सलोखा घडवून आणणे शक्य आहे की नाही किंवा घडवून आणला आहे किंवा कसे यासंबंधीची माहिती न्यायालयाला कळवण्यासंबंधी त्या व्यक्तीला निदेश देईल आणि ती कार्यवाही निकालात काढताना न्यायालय ती माहिती यथोचित रीत्या विचारात घेईल.

(४) जेथे घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विवाहाचा विच्छेद करण्यात आला असेल अशा प्रत्येक प्रकरणी, हुकूमनामा काढणारे न्यायालय प्रत्येक पक्षाला त्या हुकूमनाम्याची एकेक प्रत विनामूल्य देईल.]

घटस्फोटाच्या व अन्य कार्यवाहीमध्ये उत्तरवादीला अनुतोष.

१[(२३). घटस्फोटाच्या किंवा न्यायिक फारकतीच्या किंवा दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापन करण्याच्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये, उत्तरवादी विनंती अर्जदाराचे परगमन, क्रौर्य वा त्याने केलेला अभित्याग या कारणास्तव अनुतोषाच्या मागणीला विरोध करू शकेल, इतकेच नव्हे तर त्या कारणास्तव स्वतःला अनुतोष मिळावा असा या अधिनियमाखाली प्रतिदावाही करू शकेल; आणि जर विनंतीअर्जदाराने परगमन, क्रौर्य वा अभित्याग केल्याचे शाबीत झाले तर, उत्तरवादीने त्या कारणास्तव विनंतीअर्ज सादर करून अनुतोषाची मागणी केली असती तर त्याला किंवा तिला जो अनुतोष मिळण्याचा हक्क प्राप्त झाला असता असा या अधिनियमाखालील कोणताही अनुतोष न्यायालय त्या उत्तरवादीला देऊ शकेल.]

दावा प्रलंबित असताना निर्वाह खर्च व कार्यवाहीचा खर्च.

२४. या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत, प्रकरणपरत्वे, पत्नी किंवा पती यांपैकी कोणालाही तिचे किंवा त्याचे पोषण व कार्यवाहीचा आवश्यक खर्च यासाठी पुरेसे स्वतंत्र उत्पन्न नाही असे न्यायालयाला दिसून येईल त्या बाबतीत, ते पत्नीच्या किंवा पतीच्या अर्जावरून कार्यवाहीचा खर्च आणि कार्यवाही चालू असताना दरमहा, विनंतीअर्जदाराचे स्वतःचे उत्पन्न व उत्तरवादीचे उत्पन्न लक्षात घेता न्यायालयास वाजवी वाटेल अशी रक्कम उत्तरवादीने विनंतीअर्जदाराला द्यावी असा आदेश देऊ शकेल.

स्थायी पोटगी व निर्वाह खर्च.

२५. (१) या अधिनियमाखाली अधिकारिता वापरणारे कोणतेही न्यायालय, कोणताही हुकूमनामा करण्याच्या वेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, प्रकरणपरत्वे, पत्नी किंवा पती यांपैकी कोणीही त्या प्रयोजनासाठी त्यांच्याकडे अर्ज केल्यावर उत्तरवादीचे जर काही स्वतःचे उत्पन्न व अन्य संपत्ती असेल तर ती, अर्जदाराचे उत्पन्न व अन्य संपत्ती, ४[पक्षांचे वर्तन आणि प्रकरणातील अन्य परिस्थिती] लक्षात घेता, न्यायालयास न्याय्य वाटेल अशी ठोक रक्कम अथवा अशी मासिक किंवा नियतकालिक रक्कम अर्जदाराच्या हयातीहून अधिक नाही इतक्या मुदतीकरता अर्जदाराला उत्तरवादीने ५**** त्याच्या किंवा तिच्या निर्वाहासाठी व पोषणासाठी दिली पाहिजे असा आदेश देऊ शकेल, आणि अशी रक्कम, जरूर तर, उत्तरवादीच्या स्थावर संपत्तीवर प्रभार निर्माण करून त्याद्वारे प्रतिभूत करता येईल.

---

१. १९७६ चा अधिनियम ६८, कलम १६ द्वारे घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे "विनंतीअर्ज" याऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे घातले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे "अर्जदार अविवाहित असेतोवर" हे शब्द गाळले.

(२) जर पोटकलम (१) खाली न्यायालयाने आदेश केल्यानंतर कोणत्याही वेळी कोणत्याही पक्षाच्या परिस्थितीत बदल झाला आहे अशी न्यायालयाची खात्री झाली तर, त्याला कोणत्याही पक्षाच्या सांगण्यावरून आपणास न्याय्य वाटेल अशा रीतीने अशा कोणत्याही आदेशात फरक किंवा सुधारणा करता येईल अथवा तो विखंडित करता येईल.

(३) या कलमाखाली ज्याच्या बाजूने आदेश करण्यात आलेला आहे त्या पक्षाने पुन्हा विवाह केला आहे किंवा असा पक्ष पत्नी असल्यास ती शीलवती राहिलेली नाही किंवा असा पक्ष पती असल्यास त्याने कोणत्याही स्त्रीशी विवाहबाह्य संभोग केला आहे अशी जर न्यायालयाची खात्री झाली तर, [१][त्याला, दुसऱ्या पक्षाच्या सांगण्यावरून स्वतःस न्याय्य वाटेल अशा रीतीने अशा कोणत्याही आदेशात फरक किंवा सुधारणा करता येईल अथवा तो विखंडित करता येईल].

२६. या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत न्यायालय वेळोवेळी अज्ञान अपत्यांचा ताबा, निर्वाह व शिक्षण यासंबंधी शक्य असेल त्या त्या बाबतीत त्यांच्या इच्छेनुरूप व स्वतःला न्याय्य व उचित वाटतील असे अंतरिम आदेश देऊ शकेल व असे उपबंध हुकूमनाम्यात करू शकेल आणि हुकूमनामा झाल्यानंतर, विनंतीअर्जाद्वारे त्या प्रयोजनार्थ अर्ज आल्यावर वेळोवेळी ते अशा अपत्यांचा ताबा, निर्वाह व शिक्षण यासंबंधी अशा हुकूमनाम्याद्वारे किंवा असा हुकूमनामा मिळवण्यासाठी केलेली कार्यवाही त्यावेळेही प्रलंबित असती तर अंतरिम आदेशाद्वारे करता आले असते असे सर्व आदेश व उपबंध करू शकेल, आणि न्यायालय पूर्वी केलेले असे कोणतेही आदेश व उपबंध वेळोवेळी मागे घेऊ शकेल, निलंबित करू शकेल किंवा त्यात फरकही करू शकेल. अपत्यांचा ताबा.

२७. या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत विवाहाच्या वेळी किंवा त्या सुमारास अहेर म्हणून आलेली जी संपत्ती पती व पत्नी या उभयतांच्या संयुक्त मालकीची असेल अशा कोणत्याही संपत्ती-संबंधात न्यायालयाला आपणास न्याय्य व उचित वाटतील असे उपबंध हुकूमनाम्यात करता येतील. संपत्तीची विल्हेवाट.

[२][२८. (१) या अधिनियमाच्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये न्यायालयाने केलेले सर्व हुकूमनामे हे जणू काही न्यायालयाने आपल्या अव्वल दिवाणी अधिकारितेचा वापर करून काढलेले हुकूमनामे असावेत त्याप्रमाणे, पोटकलम (३) च्या उपबंधाच्या अधीनतेने, अपीलपात्र असतील आणि न्यायालयाने आपल्या अव्वल दिवाणी अधिकारितेचा वापर करून दिलेल्या न्यायनिर्णयांच्या विरुद्ध सर्वसाधारणपणे ज्या न्यायालयाकडे अपिले करता येतात अशा न्यायालयांकडे प्रत्येक उपरोक्त अपील होऊ शकेल. हुकूमनामे व आदेश यांवर अपिले.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये न्यायालयाने कलम २५ किंवा कलम २६ अन्वये दिलेले आदेश हे अंतरिम आदेश नसतील तर, पोटकलम (३) च्या उपबंधांच्या अधीनतेने, ते अपीलपात्र असतील, आणि न्यायालयाने आपल्या अव्वल दिवाणी अधिकारितेचा वापर करून दिलेल्या न्यायनिर्णयांच्या विरुद्ध सर्वसाधारणपणे ज्या न्यायालयाकडे अपिले करता येतात त्या न्यायालयाकडे प्रत्येक उपरोक्त अपील होऊ शकेल.

(३) केवळ जादा खर्चाच्या विषयावर या कलमान्वये अपील करता येणार नाही.

(४) या कलमाखालील प्रत्येक अपील, हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत दाखल करावे लागेल.

२८क. या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये न्यायालयाने दिलेल्या सर्व हुकूमनाम्यांची व व आदेशांची अंमलबजावणी ही, न्यायालयाने आपल्या अव्वल दिवाणी अधिकारितेचा वापर करून काढलेल्या हुकूमनाम्यांची व आदेशांची त्या त्या काळी ज्या रीतीने अंमलबजावणी केली जात असेल त्याच रीतीने करण्यात येईल.] हुकूमनाम्यांची व आदेशांची अंमलबजावणी.

## व्यावृत्ती व निरसने

२९. (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी हिंदूंमध्ये विधिपूर्वक लावलेला जो विवाह अन्यथा विधिग्राह्य आहे तो, त्यातील पक्ष एकाच गोत्राचे किंवा प्रवराचे होते अथवा भिन्न धर्मांचे, जातीचे किंवा एकाच जातीच्या भिन्न पोटशाखांचे होते एवढ्याच वस्तुस्थितीच्या कारणास्तव विधिबाह्य आहे किंवा कधीकाळी विधिबाह्य होता असे मानले जाणार नाही. व्यावृत्ती.

(२) हिंदू विवाहाचा—मग तो या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी लावलेला असो वा नंतर लावलेला असो—विच्छेद मिळविण्याचा जो कोणताही हक्क रूढीने मान्य केलेला किंवा कोणत्याही विशेष अधिनियमितीने प्रदान केलेला असेल त्यावर या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

---

१. १९७६ चा अधिनियम ६८, कलम १८ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

(३) कोणताही शून्य विवाह व रद्बातल म्हणून घोषित केला जाण्यासाठी अथवा कोणताही विवाह शून्य करण्यासाठी किंवा त्याचा विच्छेद करण्यासाठी अथवा न्यायिक फारकतीसाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली केलेली जी कार्यवाही या अधिनियमाच्या प्रारंभी प्रलंबित असेल अशा कोणत्याही कार्यवाहीवर या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळ परिणाम होणार नाही, आणि अशी कोणतीही कार्यवाही जणू काही हा अधिनियम पारित झाला नसावा अशा प्रकारे चालू ठेवून तिचा निकाल करता येईल.

(४) 'विशेष विवाह अधिनियम, १९५४' (१९५४ चा ४३) यामध्ये त्या अधिनियमाखाली हिंदूमध्ये विधिपूर्वक लावल्या जाणाऱ्या विवाहासंबंधी—मग ते या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी लावलेले असोत वा नंतर लावलेले असोत—अंतर्भूत असलेल्या उपबंधांवर या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

३०. [निरसने] 'निरसन व विशोधन अधिनियम, १९६०' (१९६० चा ५८)—कलम २ व पहिली अनुसूची याद्वारे निरसित.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई